खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर**

**प्रथम वर्ष कला**

**सेमिस्टर पहिले**

# इतिहास

# भारतीय राष्ट्रीय चळवळ (१८५७ - १९२०)

# भारतीय राष्ट्रीय चळवळ (१८५७-१९२०)

## घटक १ : १८५७ चा उठाव

अ) पार्श्वभूमी व कारणे

ब) विस्तार

क) स्वरूप

ड) परिणाम

**घटक १ : १८५७ चा उठाव**

**१. पार्श्वभूमी व कारणे**

**२. विस्तार**

**३. स्वरूप**

**४. परीणाम**

**प्रास्ताविक**

कंपनी शासन विरोधात भारतात अनेक ठिकाणी वेळोवेळी उठाव झाले. परंतु हे उठाव प्रामुख्याने स्थानिक स्वरूपाचे होते. १८५७ मध्ये भारतात झालेला मीरत येथील लष्करी छावणीतून सुरु झाला व भारताच्या मोठ्या भागावर पसरला. पूर्वीच्या उठावांपेक्षा हा उठाव अधिक व्यापक व प्रभावशाली होता. या उठावाचा उल्लेख विविध इतिहासकार वेगवेगळ्या पद्धतीने करतात. कुणाला हा उठाव बंड, कुणाला संप कुणाला शिपायांची गर्दी तर कुणाला स्वातंत्र्ययुद्ध वाटतो. कंपनीस हा उठाव सहज दडपता आला नाही. भारतीय इतिहासाला कलाटणी देणारा हा उठाव होता. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा दीपस्तंभ म्हणून या लढ्यास विशेष महत्त्व आहे. या लढ्याची कारणे, विस्तार, स्वरूप, परिणाम, अपयशाची कारणे अभ्यासणे त्यामुळेच महत्त्वाचे व आवश्यक ठरते.

**१८५७ च्या उठावाची कारणे**

**राजकीय कारणे**

**१. तैनाती फौजेचा अवलंब**

भारतातील राजकीय विघटनाचा फायदा घेत इंग्रजांनी येथील राजकारणात हस्तक्षेप सुरू केला. सत्ता स्थापन करताना नियोजनपूर्वक योजना राबविल्या. प्रदेश व प्रभुत्व निर्मितीसाठी लॉर्ड वेलस्लीने तै. फौ. ची पद्धत आखली. येथील अनेक सत्ताकेंद्रे अंतर्गत संघर्षातून परस्पर द्वेषातून कमजोर झाली. ती संरक्षणविषयक साशंक आहेत. याचा फायदा घेऊन वेलस्लीने ही योजना राबविली. हैद्राबादचा निजाम दुसरा बाजीराव नागपूरचे भोसले आयोध्येचा नबाब अशा अनेक सत्तांनी शिंदे होळकर सरदारांनी ही पद्धत स्विकारली. ही पद्धत स्विकारण्याबरोबर अनेक बंधने लादली जात. सैन्याच्या मोबदल्यात काही प्रदेश खर्चापोटी पैसा इंग्रजांना दयावा लागे.

**२. खालसा धोरण**

वेलस्लीचे प्रादेश विस्ताराचे धोरण त्यानंतरच्या ग.ज.नी पुढे कायम ठेवले. लॉर्ड डलहौसीने विस्तारासाठी अधिक आक्रमक धोरण स्विकारत खालसा धोरणाचा अवलंब केला. डलहौसीचे धोरण चांगलेच यशस्वी ठरले. संबलपूर जबलपूर झाशी अवध अशी अनेक संस्थाने खालसा झाली. ती खालसा करणे हे मुख्य उद्दिष्ट होते त्यामुळे जेथे जे कारण देता येईल ते कारण दिले गेले. दत्तक वारस नामंजूर करणे प्रशासनात गोंधळ असणे ... वगैरे.

**३. पदव्या व तनखे**

पदव्या तनखे बंद केल्याने असंतोष वाढला. डलहौसीकाळात संस्थाने खालसा करण्याबरोबर पदव्या व तनखेही बंद करण्यात आले. पदव्या तनखे वंशपरंपरागत नसतात असे डलहौसीचे मत होते. १८५२ मध्ये नानासाहेब पेशव्याचा वार्षिक आठ लाख तनखा बंद केला. पेशवा ही पदवी ही दिली नाही. १८५५ मध्ये तंजावरच्या राजाच्या मृत्यूनंतर वारसाला पदवी तनखा दिला नाही.

**सामाजिक कारणे**

**१. समाजजीवनावर संकट**

भारतीय सामाजिक जीवनात जाती व वर्णाच्या आधारावर अनेक स्तर निर्माण झाले होते. कंपनीने कायदयाचे राज्य आणल्यामुळे समाजातील हा उच्च कनिष्ठ दर्जा रद्द होऊन कायद्यासमोर सर्वांना समान लेखले जाऊ लागले. हे उच्च वर्गीयांना दुखावणारे ठरले.

**२. पाश्चात्य शिक्षण**

कंपनीने प्रशासनाच्या सोयीसाठी येथे अनेक सुधारणा केल्या. त्यापैकी एक म्हणजे शिक्षण होय. येथे प्रशासनाच्या सोयीसाठी कारकुन तयार करण्याच्या गरजेतून कंपनीने येथे शिक्षण देण्यास सुरूवात केली. १८३५ मध्ये भारतात आधुनिक शिक्षणाला सुरूवात झाली. या सुशिक्षित वर्गास आपल्याला मिळणाऱ्या अपमानस्पद वागणूकीबद्दल जाणीव होऊ लागली.

**३. वंश श्रेष्ठत्वाची भावना**

वर्णाने गोरे असणारे इंग्रज स्वत:ला भारतीयांपेक्षा श्रेष्ठ समजत. मागासलेले भारतीय प्रगत युरोपियनांची बरोबरी करू शकत नाही. आपण श्रेष्ठ वंशाचे व संस्कृतीचे असून प्रगत आहोत तर भारतीय कनिष्ठ वंशाचे व संस्कृतीचे असून मागास आहेत अशी इंग्रजांची धारणा होती. भारतीयांना ते रानटी समजत. त्यामुळे रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून भारतीयांना प्रवास करण्यास बंदी होती. युरोपियनांच्या हॉटेलमध्ये भारतीयांना प्रवेश नसे. इंग्रजांच्या भारतीयांबाबतच्या अशा भेदभावयुक्त वागणूकीमुळे भारतीयांना वेळोवेळी अपमानास सामोरे जावे लागे. त्यामुळे असंतोष वाढत गेला.

**धार्मिक कारणे**

**१. धार्मिक संकट**

१८१३ च्या सनदेनुसार कंपनी धर्मप्रसारकांना मदत करू लागली. धर्मातंर करणायाला वडिलोपार्जित संपत्तीत वाटा देण्यात येऊ लागला. तुरूंगातील कैद्याने ख्रिश्चन धर्म स्विकारल्यास त्याची मुक्तता करण्यात येत असे. अनाथांना सेवा सुविधा देऊन त्यांचे धर्मातंर केले जाई. धर्म स्विकारणायांना नोकरी दिली जाई. शाळांमधून ख्रिश्चन तत्त्वे शिकवत. कंपनीच्या अशा धोरणामुळे व्यापाराप्रमाणे आपला धर्म ही बुडेल अशी भिती भारतीयांना वाटू लागली.

**२. सुधारणांविरोधी भावना**

कंपनीने समाजसुधारणेबाबत काही महत्त्वाचे कायदे केले. हिंदु धर्मातील अनेक अनिष्ट चालींपैकी सती प्रथा एक होती. १८२९ मध्ये लॉर्ड बैंटिंगने सतीबंदीचा कायदा केला. नरबळी बंद केला. कन्यावध बंद केला. १८५६ मध्ये विधवापुनर्विवाहाचा कायदा केला. अशाप्रकारे कंपनीने काही सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करत त्यासाठी कायदे केले त्यामुळे राजकीय जीवनापाठोपाठ संस्कृतीवर धर्मावरही संकट आल्याची भावना भारतीयांमध्य निर्माण झाली. त्यातून असंतोष वाढून ...

**आर्थिक कारणे**

**१. हस्तोद्योग ऱ्हास**

साधारण १७५० दरम्यान इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती सुरू झाल्याने त्यांचे उत्पादन प्रचंड वाढले. त्यामुळे कच्चा माल नेणे व पक्का माल येथे विकण्यास सुरूवात झाली. कारखान्यात तयार झालेल्या या मालापुढे भारतात हस्तोद्योगात तयार झालेला माल टिकला नाही. त्यातच इंग्रजांनी राजकीय सत्तेचा वापर करून येथील उद्योग बंद पाडले. त्यामुळे येथील उद्योग बंद पडले. लाखो कारागिर बेकार झाले.

**२. शेतकरी**

अधिकतर भारतीय लोक शेतीवर अंवलंबुन होते. शेतकयांना दोन तृतीयांश उत्पन्न कर म्हणून कंपनीस दयावे लागे. दुष्काळातही करात कुठलीही सवलत दिली जात नसे. कर न भरणाया शेतकयांच्या जमीनीचे लिलाव केले जात. शेतीसुधारणे ऐवजी करवसुलीकडेच इंग्रजांचे अधिक लक्ष असे. कर व करभरण्यासाठी घेतलेल्या कर्जाखाली शेतकरी दबला गेला.

**३. बेकारी**

कंपनीने आपल्या विस्तारवादी धोरणानुसार अनेक संस्थाने खालसा केल्याने संस्थानिकांचे सैनिक बेकार झाले. तसेच संस्थानिकच नष्ट होऊ लागल्याने विविध कलांचा आश्रय तुटला. त्यामुळे हे कलाकार कारागिरही बेकार झाले. कंपनीच्या आयात धोरणामुळे येथील अनेक उद्योगही संकटात येऊन बेकारी वाढली. थोडक्यात कंपनीकाळात मोठयाप्रमाणावर बेकारी वाढून कंपनी शासनाविषयी असंतोष वाढून उठाव झाला.

**लष्करी कारणे**

**१. निर्बंध**

कंपनीने अनेक कायद्यांद्वारे हिंदी सैनिकांवर बंधने लादली होती. १८०६ मध्ये हिंदु शिपायांना गंध लावण्यास बंदी करून दाढी करणे सक्तीचे केले. तसेच समुद्रपर्यटन सक्तीचे केले. नकार देणा-यांच्या नोक-यां गेल्या व शिक्षा ही भोगावी लागली.

**२. सैन्य संख्या**

कंपनीकडे २ लाख ३३ हजार फौज होती. त्यापैकी भारतीय तर ४५ हजार युरोपियन सैनिक होते. ४५ युरोपियन सैनिकांपैकी ४० हजार सैनिक पंजाबात होते. त्यामुळे उर्वरित भारतात केवळ ५ हजार युरोपियन सैनिक होते. त्यामुळे भारतभर सैनिकांनी उठाव केला तर यश मिळेल असे वाटत होते.

**३. वागणूक**

लष्करात एकाच पदावर काम करणा-या भारतीय सैनिकास युरोपियन सैनिकापेक्षा कमी वेतन दिले जाई. लष्करातील उच्च पदे ही भारतीयांना दिली जात नसत. सातत्याने अपमान केला जात असे. ख्रिश्चन धर्म स्वीकारणा-या शिपायास बढती व वेतन वाढ मिळत असे. युद्धप्रसंगीही सुरूवातीस अधिक जिवीत हानी होते म्हणून भारतीय तुकडी पुढे ठेवत व विजय दृष्टीपथात आल्यावर युरोपियन तुकडी पुढे करत त्यामुळे विजयाचे श्रेय व विजयाचे भत्ते इंग्रजांना दिले जात.

**तात्कालिक कारण**

**काडतूस प्रकरण**

विविध कारणांमुळे भारतीयांच्या मनामध्ये कंपनी शासनाविषयी मोठयाप्रमाणावर असंतोष वाढला होता. वाढत्या असंतोषावर काडतूस प्रकरणाने थिणगी पडली. कंपनीने १८५७ मध्ये लष्करात एनफिल्ड नावाच्या नविन बंदुका वापरात आणल्या. या बंदुकांना लागणारी जी काडतुसे होती त्यांना गाय व डुकराच्या चरबीचे आवरण असे. ते काडतुस वापरण्यापुर्वी आवरण दाताने तोडावे लागे. गाय हिंदुंना पवित्र तर डुक्कर मुस्लिमांना निषिद्ध त्यामुळे दोन्ही समाज दुखावले गेले. दुखावले गेलेल्या सैनिकांनी ही काडतुसे वापरण्यास नकार दिला. नकार देणा-या शिपायांवर खटले भरून त्यांना १० वर्षांच्या शिक्षा सुनावल्या. त्यातून छावण्यांमधील परिस्थिती स्फोटक बनुन उठावाचा भडका उडाला.

**१८५७ च्या उठावाचा विस्तार**

मंगल पांडेस फाशी दिल्याने सैन्यात ब्रिटिशांविषयी असंतोष वाढत गेला. ठिकठिकाणच्या सैनिकी तुकडयांनी (३ मे रोजी लखनौ ६ मे रोजी आयोध्या व बंगाल तर ६ मे रोजी मीरतचे घोडदळ )काडतुसे वापरण्यास नकार दिला. त्यामुळे ९ मे रोजी न्यायालयाने या सैनिकांना १० वर्षाच्या सक्त मजूरीची शिक्षा सुनावली. यामुळे वातावरण अधिकच चिघळले व १० मे रोजी शिपायांनी बंड करत आपल्या सहका-यांना मुक्त करत इंग्रजांना ठार करण्यास सुरवात केली. शस्त्रसाठा ताब्यात घेतला. उठावाला सुरूवात झाली पण पुढे काय करायचे हे माहित नव्हते. अखेर सैनिकांनी चलो दिल्ली घोषणा देत दिल्लीच्या दिशेने वाटचाल सुरू केली.

**दिल्ली**

मीरतहून उठाव करणारे सैनिक तीस मैल दूर असणा-या दिल्लीस आले. दिल्लीतील सैनिकांनी त्यांचे स्वागत केले. ११ मे रोजी उठावक-यांनी दिल्ली ताब्यात घेतली. मोगल बादशाहीचा वारस बहादुरशहा जफर यास गादीवर बसवुन त्याचे नावाने कारभार सुरू केला. दारूगोळयाचे कोठार मात्र इंग्रजांनी पेटवुन दिल्याने ते सैनिकांच्या ताब्यात मिळाले नाही. इंग्रजांनी तारायंत्राद्वारे सर्व मुख्य केंद्रांना उठावाची बातमी पोहचविली होती. त्यामुळे उठावाला तोंड देण्याची तयारी इंग्रजांनी सर्वत्र सुरू केली होती. अल्पावधीत दिल्लीपरिसरात इंग्रजांची ६५ हजार फौज जमा झाली. उठाव करणा-या सैनिकांनी दिल्लीतही लुटालुट केली. त्यामुळे लोकांचा आश्रय तुटू लागला. त्यातच दिल्ली भोवती गोळा झालेल्या इंग्रज सैन्यांने १५ सप्टेंबर १८५७ रोजी लढयास सुरूवात केली. दहा दिवसांच्या लढयानंतर उठाव करणा-या सैनिकांचा पराभव झाला. इंग्रजांनी दिल्ली पुन्हा ताब्यात घेऊन बहादुरशहास कैद केले. दिल्लीत इंग्रजांनी मोठयाप्रमाणावर कत्तली केल्या. बादशाहीच्या वंशज २१ राजपुत्रांची कत्तल केली. बहादुरशहास ब्रह्मदेशात कैदेत ठेवले.

**कानपूर**

कानपूरपासून जवळ ब्रह्मावर्त यथे पेशव्याचे केंद्र होते. नानासाहेब पेशवा संधीची वाट पाहत होता. दिल्ली मीरतच्या बातम्या परिसरात येत होत्या. त्यात ५ जून रोजी कानपूरला इंग्रज अधिका-याने सैनिकास गोळी घातल्याने असंतोष वाढून उठाव झाला. उठाव करणारे सैनिक नेतृत्त्व नसल्याने नानासाहेब पेशव्याकडे गेले. नानासाहेबाने नेतृत्व करण्याचे मान्य केले व ते कानपूरला आले. कानपूरातील इंग्रज तोपर्यंत तेथील खंदकातील इमारतीत आश्रयास गेले होते. उठाववाल्यांनी त्या इमारतीस वेढा दिला. इंग्रजांनी २१ दिवस प्रतिकार केला अखेर करार होऊन जागा उठाव करणा-यांच्या स्वाधीन करण्यात आली. करारानुसार इंग्रजांना जाऊ दयायचे होते. परंतु इंग्रज अलाहाबादला जाण्यास नदीच्या घाटावर गेले असता उठाव करणा-यांनी गोळीबार केला. नानासाहेबाने ही कत्तल थांबविली पण त्यात अनेक इंग्रजांचा जीव गेला. विजयी उठाववाल्यांनी नानासाहेबास पेशवा जाहीर करत कंपनी राजवट नष्ट झाल्याचा जाहीरनामा घोषित केला. इंग्रजानी कानपूरला फौज पाठविली. नानासाहेबाने या फौजेवर ती कानपूरला पोहोचण्यापूर्वीच स्वारी केली. पण कानपूरवर चालून आलेल्या इंग्रज सेनानीने नानासाहेबाचा पराभव केला. १७ जुलैस इंग्रजांनी कानपूर जिंकले. नानासाहेबाने पुन्हा सैन्याची जुळवाजुळव करत लढा उभारण्याचा प्रयत्न केला पण त्यास पुन्हा अपयश आले. कानपूर पुन्हा इंग्रज वर्चस्वात गेले.

**अवध**

अवध संस्थान इंग्रजांनी खालसा केले होते. त्यामुळे तेथे इंग्रजांविषयी मोठा असंतोष होता. इतरत्र सुरू झालेल्या उठावाच्या बातम्या मिळताच अवध मध्ये ही असंतोषाला वाचा फुटली. सुमारे दोन हजार इंग्रजांनी त्यांच्या रेसीडेन्सी मध्ये आश्रय घेतला. लाखभर उठाववाल्यांनी त्यास वेढा दिला. वेढा ६ महिने चालला. या लढयाचे नेतृत्त्व बेगम हजरत महलने लहान मुलाला नबाब गादीवर बसवुन स्वत: केले. औटरॅम व हॅवलाॅक या मुत्सद्दी सेनानींनी लखनौवर चाल केली. रेसीडेन्सीचा वेढा उठाववाल्यांना उठवावा लागला. लवकरच कॅम्पबेलही लखनौकडे आला. सर्व इंग्रज सेनानींनी लखनौ काबीज केले. भारतीय सैनिकांचा त्यांच्यापुढे टिकाव लागला नाही.

**बिहार**

उठावाच्या बातम्या बिहार मध्येही पसरल्यावर तेथेही उठावास सुरूवात झाली. दानापूरच्या छावणीत उठावाच्या भीतीने इंग्रज अधिकारी लाॅईड याने भारतीयांना निशस्त्र करण्याचा निर्णय घेतला. भारतीय सैनिक शस्त्र जमा करताना गोरी फौज तेथे आल्याने आपली कत्तल केली जाणार असा भारतीयांचा समज झाला. त्यामुळे भारतीयांनी गोळीबारास सुरूवात केली व दानापूरला उठाव झाला तर जगदीशपूरला जमीनदार कुंवरसिंहाने नेतृत्त्व केले. कुंवरसिंह ... वर्षांचा होता. इंग्रजांबरोबरच्या लढाईत त्याने मोठा पराक्रम गाजविला. अखेर १८५८ मध्ये कुंवरसिंहाचा मृत्यू झाला यानंतर अमरसिंग या त्याच्या भावाने नेतृत्त्व केले. परंतु त्यास यश मिळाले नाही व इंग्रजांनी बिहारमधील उठाव चिरडला.

**झाशी**

दत्तक विधान नामंजूर करत इंग्रजांनी झाशी ताब्यात घेतली होती. झाशी उठाव होऊन सैनिकांनी इंग्रजांची कत्तल सुरू केली. राणीने सैनिकांना आर्थिक मदत दिली व लढण्याची तयारीही केली. तात्या टोपे याच्या मदतीने राणीने लढा चालविला. राणीस किल्ल्यातून पलायन करावे लागले. काल्पी ग्वाल्हेर अशी ठिकाणे बदलत राणीने पराक्रम गाजवत लढा चालू ठेवला. परंतू सर *यू रोज या सेनानी समोर टिकाव लागला नाही. राणीस हौतात्म्य आले. तात्या टोपेस फाशी झाली. नानासाहेब पेशवे परागंदा झाले.

**महाराष्ट्र**

छत्रपती प्रतापसिंह भोसले यांच्या सातारा राज्यासाठी रंगो बापूजी गुप्ते बराच काळ इंग्लडला होते परंतू त्यांना हताश होऊन भारतात परतावे लागले. येथे आल्यावर उठावाचा विचार ते करू लागले असतानाच उत्तरेत उठाव सुरू झाल्याने भोर ते बेळगाव परिसरात उठावाचे नियोजन केले. त्यासाठी कोल्हापूर पंढरपूर फलटण वाठार बेळगाव कळंबी कराड आरळे देऊर ही ठिकाणे ठरविली. परंतू इंग्रजांना आधीच सुगावा लागल्याने त्यांनी धरपकड सुरू करून उठाव होण्या आधीच चिरडला. रंगो बापूजी भूमिगत झाले. असे असले तरी महाराष्ट्रात काही ठिकाणी उठाव झाले. ते पुढीलप्रमाणे...

**कोल्हापूर :** ३१ जुलै रोजी कोल्हापूर येथे २७ व्या रेजीमेंटने उठाव करत रेजीमेंटची तिजोरी ताब्यात घेतली. इंग्रजांवर हल्ले सुरू केले. जेकबने हा उठाव दडपला. ६ डिसेंबरला कोल्हापूरात पुन्हा उठावाचा प्रयत्न झाला पण इंग्रजांनी तो दडपला.

**पेठ (नाशिक) :** कोळयांनी केलेल्या उठावास राजा भगवंतरावाने पाठिंबा दिला. ६ डिसेंबर रोजी उठाव झाला. हर्सूल बाजारात उठाव करणा-यांनी लूट केली. भील्लांनीही त्यांना मदत केली. सरकारी खजिना लुटला. परंतु इंग्रजांनी हा उठाव चिरडला.

**नाशिक – नगर :** भिल्लांनी उठाव केला. नांदगावला इंग्रजांबरोबर चकमकही झाली.

**जमखिंडी :** जमखिंडी संस्थानचे राजे अप्पासाहेब पटवर्धन इंग्रजांच्या बाजूने होते.उठावाच्या बातम्या समजल्यावर आपल्या प्रदेशात उठाव होऊ नये म्हणून त्यांनी तयारी सुरू केली. परंतू तयारी पाहून इंग्रजांना शंका आली व काही होण्यापूर्वीच तेथे इंग्रजांनी नियंत्रण प्रस्थापित केले.

**मुधोळ :** इंग्रजांनी शस्त्र परवाना कायदा केला. या विरोधात मुधोळ परिसरातील बेरडांनी उठाव केला.

**नागपूर :** नागपूर येथील सैनिकांनी उठावाची योजना केली. त्यास लखनौ कानपूर येथील उठाव करणा-यांचे सहाय्य मिळाले. परंतू उठाव होण्यापूर्वीच योजनेचा इंग्रजांना सुगावा लागला व योजना फसली.

**औरंगाबाद :** निजामी राजवटीतील औरंगाबादेतही उठवाची योजना आखली जाऊ लागली. परंतू योजना कार्यान्वित होण्यापूर्वीच संशयीतांना शोधून फाशी देण्यात आले.

याशिवाय बनारस, अलाहाबाद, पंजाब, बाणपूर, शहागड, महू, इंदूर, अजमेर, नसिराबाद, रोहिलखंड अशा अनेक ठिकाणी उठाव झाला.

**१८५७ च्या उठावाचे स्वरूप**

१८५७ मध्ये कंपनी शासन विरोधात सर्वात मोठा उठाव येथे घडून आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातील हा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. भारतीय इतिहासाला व स्वातंत्र्य लढ्याला कलाटणी देणारी ही घटना आहे. पूर्वीच्या उठावांपेक्षा १८५७ चा उठाव अनेक अर्थानी वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण होता. उठाव अपयशी ठरला तरी त्याची परिणामकारकता मोठी होती. अशा या उठावाच्या स्वरूपाविषयी विविध लेखक, इतिहासकार व नेत्यांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. थोडक्यात १८५७ च्या उठावाचे स्वरूप काय होते याविषयी मतेंमतांतरे आहेत. त्याबाबतची चर्चा पुढीलप्रमाणे ...

**०१) सशस्त्र लढा**

कंपनी शासनाविरोधात भारतात १८५७ मध्ये मोठा उठाव झाला. आधी व नंतरही राजकीय गुलामगिरी विरोधात भारतीयांनी संघर्ष केला. असे असेले तरी १८५७ चा हा उठाव सशस्त्र उठाव होता. अनेक आघाड्यांवर अनेक लढाया झाल्या. अधिकाधिक प्रदेशावर ताबा मिळविणे व टिकविणे यासाठी हा लढा झाला. भारतात स्वातंत्र्यासाठी झालेला हा सर्वात मोठा सशस्त्र लढा आहे.

**०२) शिपायांची भाऊगर्दी, बंड**

न. र. फाटक यांना १८५७ चा उठाव म्हणजे शिपायांची भाऊगर्दी वाटते. न.र.फाटक यांच्या प्रमाणेच मानवेंद्रनाथ रॉय या उठावास लष्करी बंडाळी मानतात. लॉरेन्स या उठावास शुध्द शिपायांचे बंड म्हणतो. थॉम्पसन व गॅरेट ही उठावाचा उल्लेख लष्करी उठाव म्हणून करतात. जॉन सिली म्हणतात हा उठाव राष्ट्रीय स्वरूपाच नव्हता तो केवळ लष्करी उठाव होता. किशोरचंद्र मित्रा यांच्या मते हे बंड मुलत: लष्करी बंडाच्या स्वरूपाचे आहे. एक लाख शिपायांचे हे बंड आहे. जनतेच्या सहभागाचा त्याशी संबंध नाही. थोडक्यात अनेक लेखक या उठावास केवळ लष्करी बंड मानतात. विल्यम मूर हा उठाव म्हणजे सरकार विरूध्द देशी फौज असा लढा मानतात. तर इतिहासकार सरदेसाई यांच्यामते सन ५७ चा क्षोभ हा बंडा पेक्षा जास्त क्रांतीपेक्षा कमी होता. थोडक्यात काही इतिहासकार या उठावाचे स्वरूप केवळ सैनिकी मानतात.

**०३) स्वातंत्र्य युद्ध**

काही लेखक इतिहासकार या उठावास केवळ शिपायांचे बंड मानत नाहीत. त्यांच्या मते हा स्वातंत्र्य लढा आहे. स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर या उठावास पहिले स्वातंत्र्य युद्ध मानतात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा प्रेरणा स्त्रोत म्हणून स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर या उठावाकडे पाहतात. अशोक मेहता ही १८५७ चा उठाव म्हणजे स्वातंत्र्य युद्ध असल्याची भूमिका विशद करतात. पंडित नेहरू या उठावास लोकलढा मानतात तर नेताजी सुभाषचंद्र बोस या उठावास राष्ट्रीय क्रांती म्हणतात. इतिहासकार सरदार पन्नीकर या उठावाचा उल्लेख महान राष्ट्रीय उत्थान म्हणून करतात. इंग्लडचे पंतप्रधान डिजराइली एका काडतूस प्रकरणातून एवढा मोठा लढा उभा राहू शकत नाही हा महान संग्राम आहे असे मानतात. थोडक्यात परकीय वर्चस्व, शोषण याविरोधातील हा लढा होता. म्हणूनच अनेक इतिहासकार, राष्टवादी विचारधारेचे लेखक व नेत्यांना १८५७ चा उठाव हा स्वातंत्र्य लढा वाटतो.

**०४) राष्ट्रव्यापी उठाव**

मॉलसेन हा उठाव राष्ट्रव्यापी उठाव होता असे मानतात. तर डॉ. सेन मानतात की, या उठावापर्यंत भारतात राष्ट्र संकल्पना रूजली नव्हती. पी इ रॉबर्टसही या उठावात राष्ट्रीय कल्पना नव्हती असे मानतात. आर

सी मुजुमदार यांच्या मते १८५७ चा उठाव म्हणजे राष्ट्रीय चळवळ नव्हती तर हा स्वार्थासाठी लढा होता. स्मीथ म्हणतात हा अंशत: जनतेचा उठाव होता. या उठावापासून हिंदुस्तानचा बराच मोठा प्रदेश तटस्थपणे शांत राहिला अगर इंग्रजांना सहायक झाला हे सत्य असल्याचे मत ईश्वरीप्रसाद मांडतात. त्यामुळे या उठावाचे स्वरूप राष्ट्रव्यापी होते की नाही याबाबत मतमतांतरे दिसतात.

**०५) आर्थिक कारणातून उठाव व इतर भूमिका**

अनेक इतिहासकार १८५७ चा उठाव केवळ आर्थिक कारणातून घडून आल्याचे मानतात. जॉर्ज कॅम्प्बेल म्हणतात कामगार जसे वेतनासाठी संप करतात तसा हा सैनिकांचा संपाच्या धर्तीवरील उठाव आहे. मार्क्सवादी परंपरेतील इतिहासलेखनातून उठावाचे असे आर्थिक स्वरूप पुढे येते. उठाव सुरु होताना जरी सैनिकी असला तरी कंपनी वसाहतवादाच्या विरोधी हा लढा होता. तर औटरॅम या उठावास कंपनी विरोधातील कट मानतात. फ्रन्चीस यांच्या मते या उठावाची सुरवात शिपायांचा लढा म्हणून झाली असली तरी त्याचे नंतर लोक बंडात रूपांतर झाले. निळकंठेश्वर यांच्या मते हा लढा म्हणजे जुन्या विरूध्द नव्याचा लढा होता. तर या उठावास योजनाबध्दता व कर्ती माणसे नव्हती असे मत मौलाना आझाद यांनी व्यक्त केले आहे. लोक मनाने उठावात असले तरी कृतीने अलिप्त होते असे ना के बेहेरे म्हणतात. सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक धोरणांच्या विरोधातून या उठावाची उभारणी झाल्याने उठावाचे स्वरूप व्यामिश्र दिसते.

**०६) सर्व धर्मियांचा व अखिल भारतीयांचा उठाव**

१८५७ मध्ये कंपनी विरोधात येथे झालेला उठाव हा धर्मियांचा एकत्रित लढा होता. हा लढा कुण्या एका धर्माचा वा वर्गाचा नव्हता. तसाच तो कोणा एका विशिष्ट प्रदेशाचाही नव्हता. हिंदू, मुस्लिम, शीख सर्व धर्मीय यात एकाच इंग्रज विरोधी भावनेने सहभागी झाले. विविध प्रदेशातही हीच इंग्रज विरोधी भावना दिसते. थोडक्यात १८५७ चा उठाव हा सर्व धर्मियांचा व अखिल भारतीयांचा उठाव होता.

**उठावाचे स्वरूप व मतमतांतरे**

| | |
|---|---|
| न.र.फाटक | शिपायांची भाऊगर्दी |
| मानवेंद्रनाथ राय | लष्करी बंडा ी |
| औटरम | कट |
| विल्यम मूर | सरकार विरूध्द देशी फौज |
| जार्ज कम्प्बेल | संपाच्या धर्तीवरील उठाव |
| लारेन्स | शुध्द शिपायांचे बंड |
| थाम्पसन व गरेट | लष्करी उठाव |
| किशोरचंद्र मित्रा | हे बंड मुलत: लष्करी बंडाच्या स्वरूपाचे आहे.एक लाख शिपायांचे हे बंड आहे.जनतेच्या सहभागाचा त्याशी संबंध नाही |
| जान सिली | उठावास राष्ट्रीय स्वरूप नव्हते तो लष्करी उठाव होता |
| आर सी मुजुमदार | राष्ट्रीय चळवळ नव्हती तर स्वार्थासाठी लढा |
| निळकंठेश्वर | जुन्या विरूध्द नव्याचा लढा |
| डा.सेन | राष्ट्र संकल्पना रूजली नव्हती |
| पी इ राबर्टस | राष्ट्रीय कल्पना नव्हती |
| मौलाना आझाद | योजनाबध्दता व कर्ती माणसे नव्हती |
| सरदेसाई | सन सत्तावनचा क्षोभ बंडापेक्षा जास्त क्रांतीपेक्षा कमी |
| ना के बेहेरे | मनाने उठावात कृतीने अलिप्त |
| ईश्वरीप्रसाद | हिंदुस्तानचा बराच मोठा प्रदेश तटस्थपणे शांत राहिला अगर इंग्रजांना सहायक झाला हे सत्य |
| सावरकर | पहिले स्वातंत्र्य समर |
| अशोक मेहता | स्वातंत्र्य समर |
| पं.नेहरू | लोक लढा |
| सु.बोस | राष्ट्रीय क्रांती |
| सरदार पन्नीकर | महान राष्ट्रीय उत्थान |
| फ्रन्चीस | शिपायांची सुरूवात नंतर लोक बंडात रूपांतर |
| डिजराइली | महान संग्राम |
| मालसेन | राष्ट्रव्यापी उठाव |
| स्मीथ | अंशत: जनतेचा उठाव |

**१८५७ च्या उठावाचे परिणाम**

**१. कंपनी राजवट बरखास्त**

कंपनी शासनाबाबत इंग्लंडमधील सरकार नाखुश होते. १७७३ च्या रेग्युलेटीग ॲक्ट पासून त्यांनी कंपनीवर बंधने लादण्यास सुरूवात केली. १८१३ व १८३३ च्या सनदेने कंपनीवर अनेक जबाबदारी सोपवत त्यांची व्यापारी मक्तेदारीही संपुष्टात आणली तर १८५३ च्या सनदेत पार्लमेंटची इच्छा असे पर्यंत कंपनीने राणीच्यावतीने कारभार करावा असे कलम घालण्यात आले होते. उठावाच्या रूपाने पार्लमेंटला चांगली संधी मिळाली. १८५८ मध्ये कायदा करून कंपनीची राजवट बरखास्त करण्यात आली. इंग्लंडच्या राणीची राजवट सुरू करण्यात आली. राणीच्यावतीने व्हाॅईसराॅय सर्व कारभार पाहू लागला बोर्ड आॅफ कंट्रोल व बोर्ड आॅफ डायरेक्टर ही मंडळे बरखास्त करून त्याजागी भारतमंत्री व त्याचे मंडळ नेमण्यात आले. भारतमंत्री हा पार्लमेंटचा व ब्रिटिश मंत्रिमंडळाचा सभासद असे.

**२. मोगल राजवटीचा शेवट**

बादशहाची राजवट नष्ट : बाबराने स्थापन केलेली मोगल राजवट मोडकळीस आली होती. बाहदुरशहा जफर उठावात सहभागी झाला. त्याने स्वातंत्र्य जाहीर केले होते. सप्टेंबर ५७ मध्ये इंग्रजांनी पुन्हा दिल्ली जिंकली. बहादूरशहाला कैद केले. दोषी ठरवत त्यास डिसेंबर ५८ मध्ये रंगूनला हद्दपार केले. १८६२ मध्ये तेथे त्याचा मृत्यू झाला. मोगल राजवटीचा शेवट झाला.

**३. राणीचा जाहीरनामा**

१८५७ च्या उठावातून अनेक गोष्टी राज्यकर्त्यांनाही शिकावयास मिळाल्या. भारतीय असंतोषाची जाणीव त्यांना झाली. वाढता असंतोष लक्षात घेऊन भारतविषयक धोरणात बदल करण्यात आला. हे बदलले धोरण १ नोव्हेंबर १८५८ रोजी अलाहाबाद येथे दरबार भरवुन राणीचा जाहीरनामा म्हणून घोषित करण्यात आले. आता राज्यविस्तार करणार नाही. देशी संस्थानिकांचे हक्क मानमरतब व प्रतिष्ठा राखली जाईल. त्यांनी व प्रजेने समृद्धीत रहावे. अंतर्गत शांतता व चांगले सरकार यामुळे सामाजिक प्रगती होईल. संस्थानिकांबरोबरचे कंपनीचे करार ते पाळू. संस्थानिकांना स्वेच्छेने दत्तक घेता येतील. राज्ये विलिन केली जाणार नाहीत. धर्मात ढवळाढवळ केली जाणार नाही. लायकीनुसार नोकरी दिली जाईल. धर्म वर्ग जातीनुसार नाही. जाहीरनाम्यात अशी कलमे होती. अनेक गोड अश्वासने होती.

**४. लष्कराची पुनर्रचना**

उठावाची सुरूवात लष्करात झाली होती. त्यामुळे इंग्रजांनी उठाव दडपल्यावर प्रथम लष्कराची पुनर्रचना केली. पील कमिशन नेमुन त्याच्या शिफाशीनुसार लष्करात बदल केले. इंग्रज सैनिकांचे भारतीयांशी असलेले प्रमाण १ : २ इतके वाढविण्यात आले. इंग्रज सैनिकांमुळे साहजिकच खर्च वाढला कारण इंग्रज सैनिकास भारतीय सैनिकाच्या तुलनेत चौपट खर्च होत असे. भारतीय सैनिक कमी करण्यात आले. सर्व महत्त्वाची ठिकाणे शस्त्रागार तोफखाना इंग्रज अधिका-याच्या हाती ठेवण्यात आला. पूर्वी लष्करी तुकडीत सर्व जातीचे लोक एकत्र असत. आता जातवार उभारणी सुरू झाली. पंजाबी शीख गुरखा मराठा रजपूत अशा रेजीमेंट उभारल्या गेल्या. जनतेपासून लष्कर दुर केले. सैनिकांना वर्तमानपत्रही मिळणार नाही याची काळजी घेतली. अधिकारच्या जागा इंग्रजासाठी राखीव ठेवल्या.

**५. संस्थानिक धोरण बदल**

राज्य खालसा झाली. तनखे गेले. पदव्या काढून घेतल्या. असे संस्थानिक उठावात सहभागी झाले होते. संस्थानिकांबरोबर त्यांची प्रजाही त्यात सामील झाली. संस्थानिकांचा प्रभाव लक्षात घेता आपली घ+ पकड निर्माण करण्यासाठी संस्थानिकांचे स्थान दर्जा अधिकार कायम ठेवणे गरजेचे आहे असे इंग्रजांना वाटू लागले. भविष्यात रशियाच्या विरोधात हे संस्थानिक मदतीस येतील असे वाटल्याने त्यांच्याबरोबरचे करार पाळू त्यांना दत्तक घेता येईल त्यांची राज्ये खालसा केली जाणार नाही असे सांगत पूर्वीचे आक्रमक धोरण इंग्रजांनी बदलले.

**६. सामाजिक सुधारणांचे धोरण**

सतीबंदी बालविवाहबंदी विधवाविवाह असे समाजसुधारणा कायदे कंपनीने केले. पण भारतीयांना हे आपल्या धर्म व संस्कृतीवरील संकट वाटले. त्यातून असंतोष वाढला. त्यामुळे नव्या सरकारला आपल्याविरोधात असंतोष कुठल्याच स्वरूपात वाढू दयावयाचा नव्हता. म्हणून सुधारणा चळवळीस प्रोत्साहन देणारे कायदे करायचे नाहीत. जेव्हा भारतीयांना अशा सुधारणांची गरज वाटेल तेव्हा त्यांचे सुधारक ते करतील. ते आपले काम नव्हे. यानंतर भारतातही सुधारणावादी अनेक समाज पुढे आले.

**७. इंग्रजी राजवटीबद्दल दहशत व तिरस्कार**

उठाव दडपताना कंपनी अधिका-यांनी शिपायांना ठार केले त्याबरोबर असंख्य निरपराध लोकांचाही बळी घेतला. लहान मुले वयोवृद्ध लोक स्त्रियाही त्यातून सुटल्या नाहीत. लाखभर लोकांना फाशी दिले. फाशी देण्यापूर्वीही त्याच्याशी अमानुष व्यवहार केला जात असे. या क्रौर्यामुळे भारतीयांनी इंग्रजांची दहशत घेतली. भारतीयांच्या मनात त्यांच्याविषयी कायमस्वरूपी तिरस्कार निर्माण झाला.

**८. उठावातून मिळालेला धडा**

भारतीयांना या उठावातून अनेक गोष्टी शिकावयास मिळाल्या. सरंजामी सशस्त्र उठावास आता यश मिळणार नाही याची जाणीव झाली. नानासाहेब पेशवा किंवा झाशीची राणी आता आपले नेतृत्त्व करू शकणार नाही. इंग्रजांशी लढण्यासाठी नवी हत्यारे नवी साधने आपण शोधली पाहिजेत हे भारतीयांच्या लक्षात आले.

**९. हिंदू मुस्लिमांमधील दरी वाढली**

उठावात हिंदू व मुस्लिमांमध्ये मोठे ऐक्य दिसले. दोघांच्या ऐक्याची ताकद ही दिसली. पुढे मात्र असे ऐक्य दिसले नाही. दोघांमध्ये फुट पडावी यासाठी इंग्रजांनी प्रयत्न केले. मुस्लिम उठावात त्वेषाने लढले याचा इंग्रजांना राग होता. त्यामुळे बंड मोडताना त्यांच्यावर अधिक दहशत बसवली. राज्यकारभारात हिंदूंना अधिक जवळ केले. त्यामुळे हिंदू मुस्लिमांमध्ये दरी वाढली.

**१०. परराष्ट्र धोरण इंग्लंडशी बद्ध**

नव्या राजवटीत एक महत्त्वाचा बदल झाला तो भारताच्या परराष्ट्र धोरणात. भारताचे भवितव्य इंग्लंडच्या परराष्ट्र धोरणाशी जखडण्यात आले. इंग्लंडचा शत्रू भारताचा शत्रू असल्याचे भारतीयांना सांगण्यात येऊ लागले.

**११. भारतावरील पकड घट्ट झाली**

उठावात भारतीयांच्या पराभवामुळे इंग्रजांची भारतावरील पकड घ+ झाली. येथुन पुढे सशस्त्र उठाव झाला तर तो मोडण्याची इंग्रजांनी तयारी ठेवली. इंग्रजांनी संस्थानिकांबाबत उदार धोरण ठेवत त्यांना क*यात आणले. तसेच सशस्त्र उठावाचे बळ कोणत्याच राज्यकत्र्यात राहिले नाही व कारणही राहिले नाही. भारतीयांचे नेतृत्त्व सुशिक्षितांकडे जात होते. हे सुशिक्षित इंग्रजांवर विश्वास ठेवणारे होते.

**१२. मध्यमवर्गाकडे नेतृत्त्व**

उठावपूर्वी भारतीयांचे नेतृत्त्व वेगवेगळया संस्थानिकांकडे होते. उठाव दडपल्याव्र या संस्थानिकांनी ब्रिटिशांना अनुकुल धोरणे स्वीकारली. त्यामुळे संस्थानिकांवर जनतेचा विश्वास राहिला नाही. त्यातच जनतेची दु:ख जाणणारा मांडणारा मध्यमवर्ग उदयास आला. साहजिकच लोकांचा या वर्गावर विश्वास बसुन मध्यमवर्गाकडे समाजाचे नेतृत्त्व आले.

**संदर्भ**

आधुनिक भारताचा इतिहास १७६०–१९५०, डॉ.विभा आठल्ये, अंशुल पब्लिकेशन.
आधुनिक भारत, डॉ.सुभाष भालेराव, इनसाईट पब्लिकेशन, पुणे.
आधुनिक भारत, घाडगे विद्यासागर, सक्सेस पब्लिकेशन, पुणे.
हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, डॉ.जयसिंगराव पवार, निराली प्रकाशन, पुणे.
भारताची राष्ट्रीय चळवळ, डॉ.रासकर, निराली प्रकाशन, पुणे.
भारताची राष्ट्रीय चळवळ, डॉ.राऊत, सक्सेस प्रकाशन, पुणे.
भारताची राष्ट्रीय चळवळ, डॉ.फडतरे, डायमंड प्रकाशन, पुणे.